**8 वी भारत-जॉर्जिया परराष्ट्र कार्यालयीन सल्लामसलत (डिसेंबर 13, 2025)**

13 डिसेंबर 2025

8 वी भारत-जॉर्जिया परराष्ट्र कार्यालयीन सल्लामसलत तिबिलिसी येथे 13 डिसेंबर 2025 रोजी पार पडली. भारताच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व परराष्ट्र मंत्रालयाचे सचिव (पश्चिम) श्री. सिबी जॉर्ज यांनी केले आणि जॉर्जियाच्या शिष्टमंडळाचे नेतृत्व जॉर्जियाचे उप-परराष्ट्र मंत्री माननीय श्री. अलेक्झांड ख्वितीसियाश्विली यांनी केले.

2. उभय बाजूंनी राजकीय संबंध, व्यापार व आर्थिक सहकार्य, सांस्कृतिक आदान-प्रदान व लोक संबंध तसेच, उदयोन्मुख क्षेत्रातील सहकार्य विस्तारण्याचे मार्ग यांच्यासह द्विपक्षीय संबंधांवर चर्चा केली. परस्पर हिताच्या प्रादेशिक व जागतिक मुद्यांवरही यावेळी चर्चा करण्यात आली.

3. द्विपक्षीय संबंध अधिक दृढ करण्यासाठी नियमितपणे शासकीय स्तरावरील चर्चा सुरू ठेवण्यावर यावेळी सहमती दर्शविण्यात आली.

तिबिलिसी

13 डिसेंबर 2025